# धर्मजागरण कार्याचे स्वरूप आणि परिणाम
## सुनील कुलकर्णी

सुमारे दशकभरापासून धर्मजागरण या विषयाचे कार्य वेगवेगळ्या पातळ्यांवर सुरू झाले आहे. धर्मजागरण या विषयाचे मुख्य उद्दिष्ट हिंदू अस्मितांचे, श्रद्धांचे रक्षण करणे. गेले पाच दशकांहून अधिक कालखंड ख्रिश्चन मिशनऱ्यांनी 'सेवा आणि शिक्षणाचे' सोंग घेऊन धर्मांतराचा कार्यक्रम राबविला आहे. त्यामुळे धर्मांतरित झालेल्यांची संख्या खूपच जास्त आहे. जे यापूर्वी किंवा बऱ्याच काळापूर्वी ख्रिश्चन अथवा मुसलमान झाले त्यांच्यापेक्षा यापुढे कोणीही हिंदू धर्मांतर करून ख्रिश्चन अथवा मुसलमान होऊ नये यासाठी प्रयत्न करणे अग्रक्रमाचे बनले.

धर्मजागरणाच्या कार्यासाठी लोकांच्या मनातील धर्माची निष्ठा, श्रद्धा सातत्याने चेतवण्याची गरज निर्माण झाली. त्या दृष्टीने धार्मिक उत्सवांचा चांगला उपयोग झाला. त्यातल्या त्यात वनवासी भागांमध्ये 'हनुमान जयंती' हा सर्व गावांमध्ये उत्साहाने साजरा केला जाणारा कार्यक्रम आहे हे लक्षात आले. ते निमित्त साधून हनुमान जयंतीच्या निमित्ताने गावातील सर्वांचेच एक चांगले एकत्रीकरण होत असे. या एकत्रीकरणाला अपवाद असे फक्त गावातील ख्रिश्चन झालेल्यांचा. संपूर्ण गावामध्ये ख्रिश्चनांची घरे एक दोनच असली तरी त्यांची अनुपस्थितीही जाणवणारीच असायची. प्रत्यक्षात त्यांच्या अनुपस्थितीचे कारण त्यांची कमी संख्या असते. एक दोन घरांवरून ही संख्या वाढून दहा पंधरा पर्यंत पोहोचली की ख्रिश्चन समुदायाचे खरे रूप दिसू लागते. हिंदूंच्या सणांना, समारंभांना, उत्सवांना आडकाठी करणे या कृतीतून ही मंडळी आपली उपस्थिती दाखवून देऊ लागतात. थोडक्यात त्यांची 'दादागिरी'च सुरू होते. स्वतःचे वेगळे आणि हिंदूंच्या विरुद्ध अस्तित्व दाखवण्यासाठी ख्रिश्चनांचा आटापिटा सुरू होतो. उत्सवांमध्ये उधळला जाणारा गुलाल आमच्या दिशेने फेकायचा नाही. प्रसाद आम्हाला द्यायचा नाही. कारण आम्ही ख्रिश्चन आहोत अशा छोट्या छोट्या कारणांवरून गावामध्ये तंटे व्हायला सुरुवात होते. आणि येथूनच गावातील एकता लोप पावू लागते.

वनवासींना 'तुम्ही हिंदू नाही' असे बऱ्याच वेळा सांगण्यात येत असे. त्यांच्यासाठी मूलनिवासी, आदिवासी, निसर्गपूजक असे विविध पर्यायी शब्द शोधून काढून वापरण्यात येत असत. थोडक्यात त्यांची बौद्धिक दिशाभूल करण्याचा प्रयत्न मिशनऱ्यांकडून केला जात असे. फार कमी वनवासी या तर्काला बळी पडतात. तुम्ही हिंदूच आहात आणि हिंदूच राहा हे त्यांना पटवून सांगणे फारसे कठीण जात नाही. फक्त त्यांना त्यांच्याच इतिहासाची आठवण करून द्यायला लागते. इंग्रजांच्या काळापासून मिशनऱ्यांनी या देशात मूळ धरायला सुरुवात केली. इंग्रजांनी या देशात ख्रिश्चनीकरणाला सुरुवात केली. असे असताना त्या काळी ख्रिश्चन झालेला समाज हा वनवासी नव्हता. वनवासींना आपला धर्म सोडलाच नव्हता. जे धर्मांतरित झाले ते सारे उच्चवर्णीय आणि जमीनदार वगैरे झाले. स्वातंत्र्यानंतर सामाजिक परिस्थिती बदलली पण तरीही वनवासींनी आपला धर्म सोडला नव्हता. मग तुम्ही का धर्म बदलणार असे विचारल्यावर वनवासी धर्मांतर न करण्याच्या विचारावर ठाम होतात.

दबावाला बळी पडून किंवा प्रलोभनांपोटी जे ख्रिश्चन झाले त्यांना पुन्हा आपल्यात घेण्यासाठी थोडेसे कठोर पाऊल उचलावे लागते. ख्रिश्चन कुटुंबांशी कोणत्याही प्रकारचे संबंध ठेवायचे नाहीत. एक प्रकारचा बहिष्कारच त्यांच्यावर घालायचा. हा एक अत्यंत प्रभावी उपाय, आपण सगळ्यांच्यापेक्षा काहीतरी वेगळे आहोत ही भावना क्लेषदायक बनते. याच्यातूनच ख्रिश्चन कुटुंबे पुन्हा हिंदू धर्मात आल्याची काही उदाहरणे घडली आहेत.

नाशिक जिल्ह्यात गांडुळे गावी गावातील ख्रिश्चन कुटुंबाच्या घरी लग्न कार्य निघाले. गावातील सर्व हिंदूंनी त्या कार्यामध्ये सक्रीय सहभाग घेतला. मंडप उभारण्यापासून ते घर सजवण्यापर्यंत सर्व कामे हिंदू मंडळींनी नेहमीच्या उत्साहात केली. लग्न निर्विघ्नपणे पार पडले आणि जेवण्याच्या वेळी सर्व हिंदू आपापल्या घरी निघून गेले. घरातील यजमान स्त्रीला याबद्दल खूप आश्चर्य वाटले. तिने विचारल्यावर 'आम्ही ख्रिश्चनांच्या घरी जेवत नाही असे उत्तर देण्यात आले.' त्या क्षणी त्या स्त्रीने 'मी हिंदू होते पण माझ्या घरी जेवायला चला' असे म्हणून सर्वांना आपल्या घरी जेवायला नेले. नंतर खरोखर ते कुटुंब हिंदू धर्मात परतले. ख्रिश्चनांच्या घरी न जेवणे, ख्रिश्चनांना भाड्याने घर न देणे अशा कृतीतून हिंदूंची कट्टरता वाढीला लागते आहे. हिंदुत्वाची अस्मिता अधिक बळकट करण्यासाठी अशा उपायांची योजना करावी लागते.

ख्रिश्चन धर्मात गेलेल्यांना अशा तऱ्हेने वेगळी वागणूक द्यायला सुरुवात केल्याने कुटुंबेच्या कुटुंबे पुन्हा हिंदू धर्मात परतली आहेत. एकट्या नाशिक जिल्ह्यात ३०० ते ३५० कुटुंबे पुन्हा हिंदू धर्मात परतली

आहेत. आपण धर्मपरिवर्तन केले म्हणजे काहीतरी 'महापाप' केले अशी भावना त्यांच्या मनात असते. त्यांना पुन्हा हिंदू धर्मात घेण्यासाठी आपली दारे उघडीच असली पाहिजेत. हिंदू धर्मात परत येण्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्रायश्चित्त घ्यायला लागत नाही. धर्मवापसी हा दैनंदिन कामाचा एक भाग बनून जावा इतकी साधी सोपी प्रक्रिया यासाठी आखून देण्यात आली आहे. प्रत्येक गावात त्या त्या ठिकाणची देवता पुजली जाते. स्वच्छ अंघोळ करून त्या देवतेचे मनोभावे दर्शन घेतले जाते. नाशिक जिल्ह्यात सप्तश्रृंगीदेवी, नंदुरबार जिल्ह्यात देवमोगरा, उनई येथे उननदेवाचे दर्शन धर्मवापसीच्या वेळी घेतले जाते. कुटुंब प्रमुखाने देवाची पूजा करावी. या पूजा विधीनंतर त्या कुटुंबाला देवतेची प्रतिमा, पुरुषांना भगवे उपरणे, स्त्रियांना चोळीचे कापड आणि करंडा भेट म्हणून दिला जातो. या व्यतिरिक्त कोणाच्याही दबावाशिवाय हिंदू धर्मात पुन्हा येत आहोत, अशा आशयाचे एक प्रतिज्ञापत्र कुटुंबप्रमुखाला लिहून द्यावे लागते. त्या प्रतिज्ञापत्रावर गावातील प्रमुख व्यक्तींच्या सह्या सर्वांच्या समक्ष घेतल्या जातात. या सर्व विधीनंतर हिंदू पद्धतीने आपली जीवनचर्या जगण्यास ते कुटुंब सुरुवात करते. अशा पद्धतीने धर्म वापसी झालेल्यांची संख्या खूपच समाधानकारक आहे. एकट्या नंदुरबार जिल्ह्यात ५ वर्षांच्या कालावधीत १५ हजारजण धर्मवापसीच्या कार्यक्रमातून पुन्हा हिंदू धर्मात आले. हीच संख्या नाशिक जिल्ह्यात अडीच हजारापर्यंत तर ठाणे जिल्ह्यात पाचशेपर्यंत गेली आहे.

धर्मजागरण विभागाचे काम करणारा कार्यकर्ता हा धर्माचे काम करणारा माणूस आहे. त्याला सहकार्य केले पाहिजे. धर्मांतर रोखण्यासाठी त्याला मदत केली पाहिजे असे सर्व वनवासींना पटले आहे. त्यामुळे अगदी दिवसा ढवळ्या, उघड माथ्याने होणाऱ्या मिशनऱ्यांच्या कारवायांना आळा घातला गेला आहे. काही जिल्ह्यांमध्ये आता नव्याने धर्मांतर होण्याची शक्यताच नाही. नाशिक जिल्हा हे त्याचे उत्तम उदाहरण म्हणून सांगता येईल. काही तालुक्यांमधील परिस्थिती साधारण अशीच निर्माण झाली आहे. पेठ, सटाणा, अक्कलकुवा हे तालुके त्या दृष्टीने खूपच सकारात्मक परिस्थितीत आहेत. आक्रमक हिंदुत्वाच्या भीतीने काही ठिकाणी ख्रिश्चनांना चक्क आपला गाशा गुंडाळावा लागला आहे. मिशनऱ्यांनी सुरू केलेले बचतगट बंद पाडण्यात आले आहेत. आता गावातल्या खेडूतांचाही ख्रिश्चनांवर विश्वास उरलेला नाही. ते लोक केवळ धर्मांतर करायला गावात येतात आता त्यांना आपल्या गावात येऊ द्यायचे नाही ही गावकऱ्यांची भूमिका आहे. लोकांचे प्रबोधन करण्यासाठी कीर्तनासारख्या प्रभावी माध्यमाचाही आता उपयोग होऊ लागला आहे. धर्मांतर रोखण्यामागचा योग्य हेतू संत मंडळी आपल्या कीर्तनामधून मांडू लागली आहेत. प्रबोधनाची ही भावना तात्कालिक असू नये, केवळ भावनेच्या ओघात हिंदुत्वाचे भरते येऊ नये यासाठी वर्षभर सातत्याने वेगवेगळे उपक्रम, उत्सव साजरे करण्यात येऊ लागले आहेत. वनवासी भागात आणि शहरी भागातही गणेशोत्सव, रामनवमी, नवरात्र असे उपक्रम चालू ठेवायला गेल्या ५ वर्षांत सुरुवात झाली आहे. हिंदू अस्मिता रक्षणाचे कार्य यामुळे वर्षभर वेगवेगळ्या निमित्तांनी सुरू राहिले आहे.

नव्याने कोणी हिंदू धर्मांतरित होऊ नये याच जोडीने जे यापूर्वी हिंदू झाले त्यांनी पुन्हा हिंदू धर्मात राणण्यासाठी त्यांची वेगळी ओळख व्हायला हवी. त्यासाठी सर्व गावकऱ्यांना देवतेची लॉकेट वाटणे, सर्व हिंदू घरांवर भगवी पताका लावणे यासारखे उपक्रम हाती घेण्यात आले. लॉकेट न घालणारे किंवा भगवी पताका आपल्या घरावर न लावू देणारे कुटुंब ख्रिश्चन कुटुंब हे सहजी ओळखू येते. अशा कुटुंबांना वेगळे ओळखण्याची ही युक्ती हमखास यशस्वी झाली. धर्माचे रक्षण करण्यासाठी गावोगावी धर्म रक्षाबंधनाचे कार्यक्रम घेण्यात आले. गावातील सर्व हिंदूंना या निमित्ताने एका ध्येयाने आणि भावनेने गुंफता आले. नाशिक जिल्ह्यात अडीच लाख, ठाणे जिल्ह्यात दोन लाख तर धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये सुमारे पाच लाख धर्म रक्षाबंधन झाले. या व्यतिरिक्त प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी धर्मसंम्मेलने आयोजित करण्याच्या उपक्रमालाही खूप चांगला प्रतिसाद मिळाला. डिसेंबर महिन्यात सर्वच जिल्ह्यांच्या ठिकाणी धर्म संमेलने पार पडली. त्यामध्ये 'हिंदू जगाओ, ख्रिश्चन भगाओ, ही एकच घोषणा निनादली.

ज्या ठिकाणी ख्रिश्चन किंवा मुसलमानांची संख्या अधिक आहे, अशी काही गावे स्वाभाविकतःच संवेदनशील बनली आहेत. अशा संवेदनक्षम क्षेत्रांची वेगळी निवड करून तेथे 'धर्म रक्षा समिती' या नावाने गावातीलच कार्यकर्त्यांची एक समिती निश्चित करण्यात आली. आपल्या गावात परकीय शक्ती येणार नाही हे बघण्याचे काम या समितीचे असे ठरले. गावोगाव अशी धर्मरक्षा समिती तयार झाल्याने धर्म जागरणाचे काम गावातूनच चालवले जाऊ लागले आहे.

या सर्व प्रयत्नांमधून काही तालुके ख्रिश्चनमुक्त करण्याचा प्रयत्न सुरू आहे. नाशिक जिल्ह्यातील सटाना तालुक्यात ख्रिश्चन असलेली गावे ५५ वरून ५ - ६ पर्यंत खाली घसरली आहेत.

शबरीकुंभाच्या निमित्ताने या सर्व धर्मरक्षा समित्यांना एक बळकटी मिळाली आहे. नवीन ख्रिश्चन कुटुंब शोधून काढून योग्य मार्गाने प्रबोधन केल्यास यश मिळते असा अनुभव आहे. कोणतेही प्रलोभन, आमिष न दाखवता, धर्माचा अभिमान जागृत करण्याचे प्रयत्न यशस्वी होत आहेत.